# जागतिक एड्स दिवस

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ३ डिसेंबर २०२० ला जागतिक एड्स दिवसाचे आयोजन( ZOOM ) ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून लता मंगेशकर मेडिकल कॉलेजच्या प्रा.डॉ. किर्ती मेश्राम उपस्थित होत्या, त्यांनी एचआयव्ही एड्स बद्दल मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी.ए.मेहेरे मॅडम उपस्थित होत्या कार्यक्रमाचे प्रास्ताविकडॉ.रवींद्र तिरपुडे यांनी केले प्रा.रोहिणी मेश्राम यांनी आभार व्यक्त केले या कार्यक्रमाला १४७ विद्यार्थी सहभागी झाले होते.






महाराष्ट्र टाइम्स नागपूर । शुक्रवार, ११ डिसेंबर २०२०

# एचआयव्ही जनजागृतीसाठी वेबिनार



**नागपूर :** आज जगात २० लाखांपेक्षा अधिक व्यक्ती शरीरात एचआयव्हीचा विषाणू घेऊन जगत आहेत. शारीरिक असुरक्षिततेमुळे स्वतःला संकटात ओढवून घेण्याचे प्रमाण तरुणांमध्ये दिसते. महाविद्यालयीन तरुणांनी प्रेम आणि आकर्षण समजून घेण्याची गरज आहे. शरीरातील बदलाबरोबरच लैंगिक शिक्षणाचे ज्ञान तरुणांनी घेणे काळाची गरज बनली आहे. त्यामुळे तरुणांनो, बेसावधपणे वागून स्वतःवर संकट ओढवून घेऊ नका, असे प्रतिपादन लता मंगेशकर हॉस्पिटलच्या डॉ. कीर्ती मेश्राम यांनी केले. दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व मनोसामाजिक समुपदेश विभागाच्यावतीने आयोजित जागतिक एड्स निर्मूलन दिवसानिमित्त आयोजित ऑनलाइन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. रोहिणी मेश्राम, प्रा. मिलिंद खेडकर यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहिणी मेश्राम यांनी केले. मिलिंद खेडकर यांनी आभार मानले.

